## आजचे पंचांग

शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, कृष्णपक्ष, तृतीया संध्याकाळी ५-५४ पर्यंत नंतर चतुर्थी तिथी, दिवस नक्षत्र– हस्त सकाळी ९-३० पर्यंत नंतर चित्रा, योग– गंड सकाळी ७-०६ पर्यंत नंतर वृद्धि
चंद्र रास- कन्या रात्री १०-१९ पर्यंत
सूर्य रास = कुंभ, गुरु रास= मिथुन

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

## शिवनेरी सेवेचा विस्तार

**पुणे**: मुंबई- पुणे महामार्गावर अत्याधुनिक, आरामदायी आणि सुरक्षित प्रवाशासाठी 'शिवनेरी' बसला प्रवाशांचा मोठा प्रतिसाद आहे. आता मुंबईपाठोपाठ महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये शिवनेरी धावणार असून, त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाडा, विदर्भापर्यंत शिवनेरीचा आरामदायी आणि वातानूकुलित प्रवास सुरू होणार आहे. पुणे-मुंबई-पुणे महामार्गाची राणी म्हणून ओळख मिळवलेली शिवनेरी बस स्वारगेट आणि पुणे स्टेशनवरून धावते

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. ६ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १६१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### पंजाब विधानसभेचे अधिवेशन आजपासून

**चंदीगड :** ६ मार्चपासून सुरू होणाऱ्या पंजाब विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जोरदार वादविवाद होण्याची शक्यता आहे कारण विरोधी पक्ष - काँग्रेस, भाजप आणि शिरोमणी अकाली दल कायदा आणि सुव्यवस्था आणि वाढते कर्ज यासारख्या प्रमुख मुद्द्यांवर भगवंत मान सरकारला घेरण्याचा प्रयत्न करतील. दरम्यान, ८ मार्च रोजी अर्थमंत्री हरपाल सिंग चीमा राज्याचा अर्थसंकल्प सादर करतील तेव्हा प्रत्येक महिलेला १,००० रुपये देण्याचे आपले निवडणूक आश्वासन 'आप' सरकार पूर्ण करण्याची शक्यता आहे.

### दिल्लीत होळीच्या दिवशी ४ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** होळीच्या दिवशी राजधानीत झालेल्या रस्ते अपघातांमध्ये चार जणांचा मृत्यू झाला असून, २०१९ नंतर सणाच्या दिवशी नोंदवलेली ही सर्वात कमी मृत्यूसंख्या असल्याचे दिल्ली वाहतूक पोलीस यांच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. ४ मार्च रोजी शहरात एकूण २२ रस्ते अपघातांची नोंद झाली. यामध्ये चार प्राणघातक अपघात आणि १८ किरकोळ अपघातांचा समावेश होता. या अपघातांमध्ये चार जणांना जीव गमवावा लागला, तर १८ जण जखमी झाले. यंदाच्या झालेल्या अपघातांमधील मृत्यूसंख्या गेल्या काही वर्षांच्या तुलनेत कमी आहे.

### मुकुंदपूरमध्ये वादातून हवेत गोळीबार

**नवी दिल्ली :** उत्तर दिल्लीतील मुकुंदपूर परिसरात कार चालकाशी झालेल्या वादानंतर एका व्यक्तीने हवेत गोळीबार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकारात पार्क केलेल्या दोन गाड्यांचे नुकसान झाले असल्याची माहिती दिल्ली पोलीस यांनी दिली. सायंकाळी सुमारे पाच वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला. मिळालेल्या माहितीनुसार, एका व्यक्तीने हवेत गोळीबार केला तसेच परिसरातील एका वाहनाची काच फोडण्यात आली.

### राज्यसभा निवडणुकीची औपचारिकता बाकी

# महायुतीची बिनविरोध परंपरा कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र






**मुंबई :** महाराष्ट्रातून रिक्त होणाऱ्या सात राज्यसभा जागांसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत संपताच चित्र स्पष्ट झाले. सात जागांसाठी नेमके सात अर्ज दाखल झाल्याने सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे यंदाची राज्यसभा निवडणूक औपचारिक ठरली आहे. महायुतीने राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांपासून बिनविरोध निवडीची सुरू केलेली प्रथा राज्यसभेतही कायम राहिल्याचे दिसून या निमित्ताने दिसून आले आहे.

महायुतीकडून रामदास आठवले, विनोद तावडे, माया चिंतामण इवनाते, रामराव वडकुते (भाजप), ज्योती वाघमारे (शिवसेना) आणि पार्थ पवार (राष्ट्रवादी काँग्रेस) यांची निवड निश्चित झाली आहे. महाविकास आघाडीकडून शरद पवार यांची राज्यसभेवर निवड झाली आहे.

औपचारिक प्रक्रियेनुसार मतदान १६ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत होणार असून मतमोजणी त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता केली जाईल. मात्र उमेदवारांची संख्या जागांइतकीच असल्याने निकाल आधीच निश्चित झाला आहे. राज्यसभा निवडणूक एकल हस्तांतरणीय मतपद्धतीने घेतली जाते. महाराष्ट्र विधानसभेतील २८८ आमदार हे या निवडणुकीचे मतदार असतात.

एका उमेदवाराला निवडून येण्यासाठी सुमारे ३७ मतांची आवश्यकता असते. सध्याच्या घडीला महायुतीकडे सुमारे २३० आमदारांचे संख्याबळ असल्याने सहा जागा जिंकण्याची त्यांची क्षमता स्पष्ट होती, तर महाविकास आघाडीकडे सुमारे ५० आमदार असल्याने शरद पवार यांची एक जागा सुरक्षित मानली जात होती.

दरम्यान, आमदार रोहित पवार यांनी फेसबुक पोस्टद्वारे सर्व निवडून आलेल्या उमेदवारांचे अभिनंदन केले. हे सर्वजण महाराष्ट्राचा प्रभावी आवाज म्हणून राज्यसभेत कामगिरी बजावतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कोणत्याही गैरप्रकारांना वाव न देता बिनविरोध निवड प्रक्रिया पार पडल्याबद्दल त्यांनी सर्व पक्षांचे आभारही मानले.

यंदाची राज्यसभा निवडणूक संख्याबळाच्या राजकारणाऐवजी सामंजस्याच्या भूमिकेतून पार पडल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे संभाव्य चुरशीची लढत टळली असून सातही उमेदवारांची संसदेच्या उच्च सभागृहातील प्रवेश निश्चित झाला आहे.

# अमेरिकेच्या दाव्याला भारताने फेटाळले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिका इराणविरुद्ध लष्करी कारवाईसाठी भारतीय बंदरे आणि नौदल तळांचा वापर करत असल्याच्या दाव्यांना भारताने ठामपणे फेटाळून लावले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने (एमईए ) हे दावे निराधार आणि बनावट असल्याचे सांगत स्पष्ट केले की त्यामध्ये कोणतीही तथ्यात्मकता नाही.

परराष्ट्र मंत्रालयाने बुधवारी (४ मार्च) सोशल मीडिया प्लॅटफॉर्म "एक्स" वर म्हटले की, "अशा निराधार आणि मनगढंत टिप्पणींपासून दूर राहण्याचा आम्ही सल्ला देतो." मंत्रालयाने स्पष्ट केले की, भारत कोणत्याही देशाला इराणविरुद्ध लष्करी हल्ल्यांसाठी आपल्या बंदरांचा वापर करण्याची परवानगी देत नाही. यासोबतच भारताने पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. भारताने सर्व पक्षांना संयम बाळगण्याचे, तणाव आणखी वाढू न देण्याचे आणि सामान्य नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे.

भारताची ही प्रतिक्रिया अमेरिकेचे माजी सैन्य अधिकारी कर्नल डग्लस मॅकग्रेगर यांनी दिलेल्या एका मुलाखतीनंतर आली. त्यांनी एका अमेरिकन चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत दावा केला होता की, इराणसोबतच्या युद्धादरम्यान अमेरिकेचे अनेक नौदल तळ नष्ट झाले असून आता त्यांना भारत आणि भारतीय बंदरांवर अवलंबून राहावे लागत आहे.

मॅकग्रेगर यांनी असे म्हटले होते, "आमचे सर्व बेस नष्ट झाले आहेत, आमची बंदर व्यवस्था देखील उद्ध्वस्त झाली आहे. आता आम्हाला भारत आणि भारतीय बंदरांवर अवलंबून राहावे लागत आहे, जे आदर्श परिस्थिती नाही."

# अयातुल्ला अली खामेनी यांना भारताची श्रद्धांजली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे इराणविरोधात लष्करी कारवाई केल्यानंतर २८ फेब्रुवारी रोजी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. या घटनेनंतर भारताने अधिकृतरीत्या शोक व्यक्त करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी केंद्र सरकारच्या वतीने नवी दिल्लीतील इराणी दूतावासाला भेट दिली. त्यांनी तेथे खामेनी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करणाऱ्या अभ्यागत पुस्तिकेत स्वाक्षरी करून भारताची संवेदना नोंदवली. या भेटीला राजनैतिक दृष्ट्या महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. शनिवारी (२८ फेब्रुवारी) झालेल्या संयुक्त हल्ल्यात खामेनी यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील काही सदस्य आणि इराणमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. या घटनेनंतर इराणने खामेनी यांना 'शहीद' दर्जा जाहीर केला आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दुपारी पश्चिम आशियातील वाढत्या लष्करी संघर्षावर भाष्य करत "लष्करी संघर्ष हा कोणत्याही समस्येवरचा तोडगा नाही," असे मत व्यक्त केले. त्यांच्या या वक्तव्यानंतर काही वेळातच परराष्ट्र सचिवांनी इराणी दूतावासाला भेट दिल्याने भारत सरकार संघर्षाऐवजी संवाद आणि मुत्सद्देगिरीवर भर देत असल्याचा संदेश देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भारताने संतुलित भूमिका घेत राजनैतिक संवादाच्या माध्यमातून शांततेचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे.

### शिक्षक संघटनांचा निर्णयाला विरोध

# लाखो शिक्षकांची माहिती शालार्थ प्रणालीवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यातील खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची माहिती अधिकारांतर्गत शालार्थ प्रणालीवर प्रसिद्ध करण्याचा निर्णय शिक्षण संचालनालयाने ४ मार्च २०२६ रोजी घेतला आहे. यामध्ये शिक्षकांच्या सेवेत रूजू झाल्याची तारीख, वेतनश्रेणी, सेवानिवृत्तीची माहिती, शाळेचे नाव व पदनाम यांचा समावेश आहे. शिक्षण संचालनालयाच्या मते, हा निर्णय कामकाजामध्ये पारदर्शकता वाढवण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

या निर्णयाला शिक्षक संघटनांनी विरोध व्यक्त केला आहे. शिक्षक महासंघाचे मुंबई व कोकण विभाग अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी म्हटले की, शिक्षण विभागाचा हा निर्णय भारतीय संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करतो. ते म्हणाले, "शासन वेतन देत असले तरी हे शिक्षकांच्या मेहनतीचे आणि हक्काचे आहे. या माहितीचे सार्वजनिक प्रकटीकरण बेकायदेशीर ठरेल. त्यामुळे हा निर्णय तातडीने मागे घ्यावा."

या आदेशानुसार माहिती राज्य मंडळ, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, मुंबईतील शिक्षण निरीक्षक तसेच सर्व महानगरपालिका, नगरपालिका आणि नगर परिषद प्रशासन अधिकारी यांना दिली गेली आहे. तसेच ही माहिती महाआयटीच्या अधिकाऱ्यांनाही शालार्थ प्रणालीवर प्रकाशित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शासनाच्या या निर्णयामुळे राज्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची माहिती सर्वसामान्यांसाठी खुली होणार आहे. अंदाजे साडेसात लाख शिक्षकांचा डेटा या प्रणालीत प्रवेशयोग्य असेल.

या माहितीत शिक्षकांचे मूळ वेतन, घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता आणि भविष्य निर्वाह निधी यांचा तपशील समाविष्ट आहे. दुसरीकडे, शिक्षण संचालनालयाचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर यांनी स्पष्ट केले की, माहिती अधिकारांतर्गत उपलब्ध होणारीच माहिती शालार्थ प्रणालीवर प्रकाशित केली जाणार आहे. कोणतीही वैयक्तिक माहिती सार्वजनिक होणार नाही. त्यामुळे शिक्षक संघटनांच्या विरोधाचे कारण नाही, असे पालकर यांनी सांगितले.

या निर्णयामुळे शाळा व्यवस्थापन आणि शिक्षक यांच्यात पारदर्शकता वाढेल, तसेच माहिती अधिकाराचा उद्देश अधिक प्रभावीपणे साधला जाईल, असे मानले जाते.

### धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६ विधेयकावर शिक्कामोर्तब

# धर्मांतरविरोधी कायद्याला मंत्रिमंडळाची मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्रातील बहुप्रतिक्षित धर्मांतरविरोधी कायद्याला अखेर राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत 'धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६' या विधेयकावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले. राज्याचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांनी विधानभवन परिसरात माध्यमांशी संवाद साधत या निर्णयाची अधिकृत माहिती दिली.

निवडणुकीदरम्यान दिलेले आश्वासन पूर्ण केल्याचा दावा करताना नितेश राणे म्हणाले की, राज्यात जबरदस्ती, फसवणूक, प्रलोभन किंवा विवाहाच्या माध्यमातून होणारे धर्मांतर रोखण्यासाठी हा कायदा आणण्यात आला आहे. महिलांच्या संरक्षणाच्या दृष्टीने हा कायदा महत्त्वाचा ठरेल, असे त्यांनी नमूद केले. 'लव्ह जिहाद'सारख्या प्रकारांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याचा या कायद्याचा उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या कायद्याचा शासन निर्णय (जीआर) लवकरच निर्गमित होणार असून त्यानंतर राज्यभर अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू होईल. कायद्याच्या सविस्तर तरतुदी आणि प्रक्रियाविषयक माहिती लवकरच अधिकृतरीत्या जाहीर करण्यात येईल, असेही राणे यांनी सांगितले. कायद्याच्या प्रमुख तरतुदींनुसार, दबाव, फसवणूक किंवा आर्थिक प्रलोभन देऊन धर्मांतर केल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. अशा प्रकारचे गुन्हे अजामीनपात्र स्वरूपाचे असू शकतात, अशी तरतूद करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. सामूहिक धर्मांतराच्या प्रकरणांत पोलीस यंत्रणेला थेट कारवाई करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. तसेच, पूर्वी धर्मांतरित झालेल्या व्यक्तींना स्वेच्छेने मूळ धर्मात परत येण्यासाठी कायदेशीर संरक्षण व मदत देण्याची तरतूदही या कायद्यात असल्याचे सांगण्यात आले.सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचा आधार घेऊन आणि घटनात्मक चौकटीत राहूनच या कायद्याचा मसुदा तयार करण्यात आल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला आहे. धार्मिक स्वातंत्र्य आणि सार्वजनिक सुव्यवस्था यामधील समतोल राखण्याचा प्रयत्न या कायद्याद्वारे करण्यात आल्याचे सत्ताधाऱ्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, या निर्णयाचे राज्याच्या राजकारणावर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सत्ताधारी पक्षाने याला ऐतिहासिक आणि निर्णायक पाऊल ठरवले असले, तरी विरोधी पक्षांकडून या कायद्याच्या अंमलबजावणीच्या पद्धतीवर आणि संभाव्य परिणामांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होण्याची शक्यता आहे.

### मिठी नदी घोटाळा; कंत्राटदाराला जामीन

**मुंबई :** मिठी नदी गाळ काढण्याच्या ६५ कोटी रुपयांच्या घोटाळ्यात अटक केलेल्या कंत्राटदार शेरसिंग राठोड (५२) याला न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाने म्हटले की, राठोड या प्रकरणातील सह-आरोपी आणि महानगरपालिका अधिकाऱ्यांनी रचलेल्या कटात सहभागी नव्हता. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने राठोडला अटक केली होती. त्याच्यावर बनावट बिलांद्वारे २९.६२ कोटी रुपये मिळविल्याचा आरोप आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर राठोड जामीनावर मुक्त झाला आहे, मात्र प्रकरणातील तपास पुढे सुरू राहणार आहे.

# शिंदेसेनेत राज्यसभेवर नाराजीनाट्य

### माजी खासदार अडसूळ यांची खदखद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज भरायला अवघे काही तास शिल्लक असताना, शिंदेसेनेनं ज्योती वाघमारे यांना उमेदवारी जाहीर केली. पक्षातील वरिष्ठ नेत्यांना मागे टाकून वाघमारे यांनी राज्यसभेचं तिकीट मिळवलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

यानंतर शिंदेसेनेत नाराजीनाट्य पाहायला मिळत आहे, तर माजी खासदार आनंदराव अडसूळ यांची खदखद समोर आली आहे.

राज्यातील सात राज्यसभा जागा रिक्त आहेत. यासाठी चार पक्षांकडून सात नावं जाहीर करण्यात आली आहेत. सात जागांसाठी सात उमेदवार असल्याने निवडणूक बिनविरोध होईल. शिंदेसेनेकडून माजी खासदार आनंदराव अडसूळ, राहुल शेवाळे, संजय निरुपम, प्रवक्त्या शायना एनसी यांची नावं चर्चेत होती. मात्र या दिग्गजांना मागे टाकून ज्योती वाघमारे यांनी बाजी मारली.

याबाबत अडसूळ यांनी सांगितले, वरिष्ठांच्या मनात जे होतं, ते झालं. आता त्यावर अधिक बोलणं मला योग्य वाटत नाही. राज्यपाल पदाचा विषय सोडा, तुमच्या कोट्यातून राज्यसभा तरी द्या. माझी मागणी काही चुकीची नव्हती. प्रत्येक वेळी हो हो म्हटलं जातं, पण होत काहीच नाही. हा माझा अनुभव आहे. केंद्रीय मंत्री अमित शहांपासून अनेकांनी आश्वासनं दिली. राज्यपाल करणार असं सांगितलं. त्याला २ वर्षे लोटली. या कालावधीत १० राज्यपाल नियुक्त झाले. पण माझा नंबर लागला नाही, असं अडसूळ म्हणाले. शेवटी मीच ऑफर दिली.

राज्यपाल पदाचा विषय सोडा, तुमच्या कोट्यातून राज्यसभा तरी द्या. माझी मागणी काही चुकीची नव्हती. प्रत्येक वेळी हो हो म्हटलं जातं. पण होत काहीच नाही. त्यांनी दिलेलं नाही आणि भविष्यात देणारही नाहीत. हा माझा अनुभव आहे, अशा शब्दांत अडसूळ यांनी नाराजी व्यक्त केली.

### अध्यक्ष ओम बिर्ला हटवण्याच्या ठरावावर चर्चा

# लोकसभेत सोमवारी घडणार दुर्मिळ संसदीय घटना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लोकसभेत येत्या सोमवारी एक ऐतिहासिक संसदीय घटना घडण्याची शक्यता आहे. सभागृहाचे अध्यक्ष ओम बिर्ला हे कामकाजाचे अध्यक्षस्थान भूषवणार नसून सदस्यांमध्ये बसलेले दिसतील, कारण त्यांना पदावरून हटवण्याची मागणी करणारा ठराव सभागृहासमोर मांडला जाणार आहे.

९ मार्च रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याची बैठक होत असताना विरोधी पक्षाने दिलेली ही सूचना चर्चेसाठी घेतली जाऊ शकते. बिर्ला यांनी कामकाज "स्पष्टपणे पक्षपाती" पद्धतीने चालवले, असा आरोप विरोधकांनी केला आहे.



लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात १० फेब्रुवारी २०२६ रोजी 'इंडिया' आघाडीच्या वतीने अविश्वास प्रस्तावाची नोटीस बजावण्यात आली आहे. काँग्रेस खासदार गौरव गोगोई, के. सुरेश आणि मोहम्मद जावेद यांनी ही नोटीस लोकसभा सचिवालयात सादर केली आहे. नियम आणि संसदीय परंपरेनुसार, ठराव चर्चेसाठी घेतल्यास अध्यक्षांना स्वतःचा बचाव मांडण्याचा अधिकार असतो. संविधान तज्ज्ञ पी.डी.टी. आचार्य यांनी स्पष्ट केले की, बिर्ला यांना ठरावावर मतदान करण्याचाही अधिकार असेल. मात्र ते अध्यक्षस्थानावर बसणार नाहीत. त्यांना ट्रेझरी बाकांमधील प्रमुख रांगेत बसवले जाईल. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इतर विरोधी सदस्यांना बोलण्याची संधी नाकारल्याचा तसेच आठ खासदारांना निलंबित केल्याचा आरोप करत हा ठराव मांडण्यात आला आहे. काँग्रेस सदस्य आणि मुख्य प्रतोद के. सुरेश यांनी त्यांच्या पक्षासह समाजवादी पक्ष, द्रविड मुनेत्र कळघम आणि इतर काही विरोधी पक्षांच्या वतीने लोकसभा सचिवालयात ही सूचना सादर केली. मात्र तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी या नोटिशीवर स्वाक्षरी केलेली नाही.

लोकसभेचे माजी सरचिटणीस आचार्य यांनी सांगितले की, अशा परिस्थितीत अध्यक्षांना कोणत्या जागेवर बसवायचे याबाबत नियमांमध्ये स्पष्ट उल्लेख नाही. स्वयंचलित मतदान प्रणालीद्वारे ते मतदान करू शकणार नाहीत; त्यासाठी त्यांना मत नोंदविण्याची स्लिप भरावी लागेल. संविधानाच्या कलम ९६नुसार, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांना पदावरून हटवण्याचा ठराव विचाराधीन असताना ते सभागृहाचे अध्यक्षस्थान भूषवू शकत नाहीत. ठराव मांडण्यासाठी किमान दोन लोकसभा सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक असतात; त्यापेक्षा अधिक सदस्यही नोटिशीवर स्वाक्षरी करू शकतात.

दरम्यान, संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी या ठरावावर ९ मार्च रोजी चर्चा आणि मतदान होणार असल्याचे संकेत दिले आहेत. लोकसभेच्या इतिहासात अध्यक्षाविरुद्ध ठराव मांडण्याचे प्रसंग अत्यंत दुर्मिळ मानले जातात. त्यामुळे सोमवारी सभागृहात घडणाऱ्या घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

#### ऐतिहासिक पार्श्वभूमी

- स्वतंत्र भारताच्या संसदीय इतिहासात आजपर्यंत एकाही लोकसभा अध्यक्षांना अविश्वास प्रस्तावाद्वारे पदावरून हटवण्यात आलेले नाही. जरी काही प्रसंगी अध्यक्षांविरोधात हटवण्याचे प्रस्ताव मांडण्यात आले असले, तरी ते यशस्वी ठरलेले नाहीत. १९५४ मध्ये जी. व्ही. मावळणकर, १९६६ मध्ये हुकम सिंग आणि १९८७ मध्ये बलराम जाखड यांच्या विरोधात प्रस्ताव आले होते; मात्र हे सर्व प्रस्ताव सभागृहात फेटाळले गेले. त्यामुळे लोकसभा अध्यक्षांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव यशस्वी होण्याची घटना भारतीय संसदीय इतिहासात अद्याप घडलेली नाही.

# बिहारमध्ये भाजप सरकार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** जनता दल (युनायटेड) चे प्रमुख नितीश कुमार यांनी राज्यसभा सदस्य होण्याची इच्छा व्यक्त केल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सत्तासमीकरणे वेगाने बदलत आहेत. त्यांच्या या भूमिकेमुळे नव्या सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाल्याचे मानले जात असून, भारतीय जनता पक्षाला स्वतःचा मुख्यमंत्री देण्याची संधी मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

चार महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष ८९ जागांसह सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला होता. २०२० नंतर दुसऱ्यांदा भाजपने जद(यू)ला जागांच्या संख्येत मागे टाकले होते. त्यावेळीही नेतृत्वाच्या प्रश्नावर चर्चा रंगली होती; मात्र सत्तासंतुलनाच्या राजकारणामुळे मुख्यमंत्रीपद जद(यू)कडेच राहिले. आता मात्र परिस्थिती वेगळी आहे. राज्यसभेच्या माध्यमातून राष्ट्रीय राजकारणात सक्रिय होण्याची इच्छा नितीश कुमार यांनी व्यक्त केल्याने राज्यातील नेतृत्वबदलाचा मार्ग सुकर होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. भाजपला हिंदी पट्ट्यातील त्या महत्त्वाच्या राज्यात स्वतःचा मुख्यमंत्री देण्याची संधी अद्याप मिळाली नव्हती, जिथे तो प्रमुख घटक पक्ष असूनही नेतृत्व भागीदाराकडेच राहिले होते.

भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी आघाडीच्या राजकारणात जद(यू)चा प्रभाव कायम होता. मात्र, बदलत्या राजकीय घडामोडी आणि केंद्रातील समीकरणे लक्षात घेता भाजप आता राज्यातील नेतृत्व स्वतःकडे घेण्यास सज्ज असल्याचे संकेत मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात नव्या सत्ताकाळाची तयारी सुरू झाली असून, पुढील काही दिवसांत औपचारिक निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## संपादकीय

# भारतासमोरील ऊर्जा व सामरिक संकट




**पश्चिम आशियातील संघर्षाचा विस्तार आता हिंद महासागरापर्यंत पोहोचला आहे. ऊर्जा वाहतुकीचे मार्ग, सागरी सुरक्षितता आणि भारताची अर्थव्यवस्था या तिन्हींच्या छेदनबिंदूवर ही धोक्याची घंटा वाजते आहे. तेलदर, व्यापार तूट आणि परराष्ट्र धोरण या सर्वच आघाड्यांवर भारताची कसोटी लागणार आहे.**

पश्चिम आशियातील संघर्ष हा काही नवा नाही. परंतु यावेळचा फरक असा की त्याचे पडसाद आता पर्शियन आखातापुरते मर्यादित राहिलेले नाहीत. ते हिंद महासागरापर्यंत उमटू लागले आहेत. एका इराणी युद्धनौकेच्या बुडण्याच्या घटनेने या संघर्षाला नवा भौगोलिक आयाम मिळाला आहे. हा विस्तार केवळ नकाशावरील हालचाल नाही; तो भारतासारख्या समुद्रकेंद्रित अर्थव्यवस्थेसाठी स्पष्ट इशारा आहे. भारताची ऊर्जा सुरक्षितता ही समुद्राशी निगडित आहे. आपल्या कच्च्या तेलाच्या आयातीपैकी मोठा हिस्सा होर्मुझ सामुद्रधुनीतून येतो. या सामुद्रधुनीतून जगातील जवळजवळ पाचवा भाग तेल-वाहतूक होते. तेथे तणाव वाढला की बाजार अस्थिर होतो. विमा प्रीमियम वाढतात. जहाजांचे मार्ग बदलतात. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तेलाचे दर चढू लागतात. तेलाच्या दरातील प्रत्येक डॉलरची वाढ भारताच्या आयात बिलात अब्जावधींची भर घालते. व्यापार तुटीवर ताण येतो. रुपयावर दबाव वाढतो. चलनवाढीचा भडका उडतो. पेट्रोल-डिझेल दरवाढ ही फक्त वाहनधारकांची समस्या राहत नाही; ती शेतीपासून उद्योगापर्यंत सर्व क्षेत्रांना झळ पोहोचवते. महागाईचा रेटा सामान्य नागरिकांच्या घरगुती अर्थकारणाला अस्थिर करतो. यात आणखी एक पैलू आहे आणि तो म्हणजे समुद्री मार्गांची सुरक्षितता. हिंद महासागर हा भारताचा नैसर्गिक सामरिक परिसर मानला जातो. परंतु आता त्याच जलरस्त्यावर जागतिक शक्तींचा संघर्ष उलगडताना दिसतो. याचा अर्थ असा की भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणांवर नव्याने विचार करण्याची वेळ आली आहे. 'सागरी प्रभावक्षेत्र' ही केवळ संकल्पना राहू नये; ती ठोस कृतीत उतरली पाहिजे. पश्चिम आशियात लाखो भारतीय कामगार कार्यरत आहेत. त्यांच्याकडून दरवर्षी अब्जावधी डॉलर भारतात येतात. युद्धाची छाया गडद झाली तर या कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. विमानसेवा विस्कळीत होते. स्थलांतरितांना परत आणण्याची मोहीम उभी राहते. हा केवळ भावनिक नव्हे तर आर्थिक प्रश्न आहे. परदेशी चलनाचा मोठा स्रोत अस्थिर झाला तर त्याचे दुष्परिणाम दूरगामी ठरतात. युद्धाचा विस्तार हा ऊर्जा-राजकारणाचा भाग आहे. जगातील शक्तिसंतुलनात बदल होत आहेत. एका बाजूला अमेरिकेची उपस्थिती, दुसऱ्या बाजूला इराणचा प्रादेशिक प्रभाव, आणि तिसऱ्या बाजूला रशिया-चीनचे समीकरण. या गुंतागुंतीच्या समीकरणात भारताने आपले स्थान काळजीपूर्वक निश्चित करणे आवश्यक आहे. भारताने कोणत्याही गटात उडी मारण्यापेक्षा संवादाचा पूल बनणे अधिक हिताचे. पश्चिम आशियातील सर्व प्रमुख देशांशी भारताचे आर्थिक आणि ऊर्जा संबंध आहेत. त्यामुळे तटस्थतेला कणखर मुत्सद्देगिरीची जोड देणे अपरिहार्य आहे. एखाद्या विशिष्ट प्रदेशावर अतिनिर्भरता धोकादायक ठरते. आफ्रिका, लॅटिन अमेरिका, अमेरिकेतील पुरवठा, तसेच देशांतर्गत अक्षय ऊर्जेचा वेगाने विकास या सर्वांचा संगम साधणे आवश्यक आहे. ऊर्जा सुरक्षितता ही केवळ तेलसाठ्यांची बाब नाही; ती दीर्घकालीन आर्थिक स्वावलंबनाशी संबंधित आहे. चौथे म्हणजे, सागरी सुरक्षा बळकट करणे. भारतीय नौदलाची उपस्थिती, गस्त, आणि मित्रदेशांशी सहकार्य वाढवणे आवश्यक आहे. हिंद महासागरातील समुद्री मार्ग सुरक्षित राहिले, तरच व्यापार आणि ऊर्जा पुरवठा स्थिर राहील. या संपूर्ण घडामोडींकडे केवळ युद्धवार्ता म्हणून पाहणे चूक ठरेल. हे एका व्यापक भू-राजकीय परिवर्तनाचे लक्षण आहे. ऊर्जा, व्यापार, आणि सुरक्षा या तिन्ही गोष्टी आता अविभाज्य झाल्या आहेत. समुद्रात उसळणारी प्रत्येक लाट बाजारात कंपन निर्माण करते, आणि त्या कंपनांचा प्रतिध्वनी आपल्या घरगुती अर्थव्यवस्थेत ऐकू येतो. भारतासाठी ही वेळ धोक्याची असली तरी संधीचीही आहे. जागतिक शक्तींच्या स्पर्धेत संतुलित भूमिका घेत, ऊर्जा स्वावलंबनाकडे वाटचाल करत, आणि सागरी सुरक्षेची कास धरत भारत आपले स्थान अधिक दृढ करू शकतो. जागतिक संघर्षांचा आवाज दूरवरून येत नाही. तो आपल्या किनाऱ्यावर आपटतो. आणि त्या आवाजाला प्रतिसाद देताना शहाणपण, संयम आणि दूरदृष्टी या तिन्हींची कसोटी लागते. भारतासमोरील हे ऊर्जा व सामरिक संकट तात्पुरते नाही. ते नव्या युगाची चाहूल देत आहे. प्रश्न इतकाच आणि आपण त्यासाठी सज्ज आहोत का? हा खरा प्रश्न.

# दक्षिण आशियातील नव्या धगधगीत सीमारेषा

**» पश्चिम आशियातील युद्धाच्या धगीदरम्यान दक्षिण आशियातही संघर्षाचा नवा अध्याय सुरू झाला आहे. अफगाणिस्तान-पाकिस्तान सीमारेषेवरील उघड लष्करी कारवाया या प्रदेशाला अस्थिरतेच्या गर्तेत ढकलू शकतात.**



पश्चिम आशियात गोळीबार सुरू असतानाच आपल्या उपखंडातही बंदुकींचा आवाज घुमू लागला आहे. अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव आता सीमापार हवाई हल्ल्यांपर्यंत पोहोचला आहे. अनेक महिन्यांच्या चकमकींनंतर ऑक्टोबर २०२५ मध्ये इस्लामाबादने पाकिस्तानातील दहशतवादी हल्ल्यांसाठी जबाबदार घटकांना आश्रय दिल्याचा आरोप काबूलवर केला आणि संघर्षाचे रूपांतर उघड लष्करी कारवाईत झाले. २१ फेब्रुवारीला रावळपिंडीहून तहरीक-ए-तालिबान

पाकिस्तान (टीटीपी)शी संबंधित ठिकाणांवर हवाई हल्ले झाले. त्यास तालिबानने सीमावर्ती पाकिस्तानी तळांना लक्ष्य करून प्रत्युत्तर दिले. त्यानंतर पाकिस्तानने 'ऑपरेशन गझब लिल हक'च्या माध्यमातून काबूल, कंधार, पक्तिया आणि नांगरहार येथे कारवाया केल्या. संवादाची जागा दारूगोळ्याने घेतली आहे. या संघर्षाचे मूळ समजून घेतले तर त्यात इतिहासाचा गडद ठसा दिसतो. २०२१ मध्ये अफगाण तालिबानने अमेरिकन सैन्याच्या माघारीनंतर सत्ता हस्तगत केली तेव्हा इस्लामाबादला काबूलमध्ये आपल्याशी सुसंवादी सरकार हवे होते. 'सामरिक खोली' या संकल्पनेनुसार पाकिस्तानला पश्चिमेकडील सीमाभाग सुरक्षित ठेवून भारतावर लक्ष केंद्रित करायचे होते. परंतु भूगोल आणि वांशिक वास्तवाने त्यांचे गणित विस्कटले. पाकिस्तानी तालिबान आणि अफगाण तालिबान यांच्यातील वैचारिक आणि वांशिक नाते या दोन्हींची प्रमुख ओळख ही पश्तून म्हणजेच सहज तुटणारी नव्हती. ड्युरंड रेषा ही ब्रिटिशकालीन सीमारेषा अनेक पश्तून राष्ट्रवाद्यांना मान्य नाही. त्यामुळे सीमावर्ती भागात निष्ठेची रेषा राज्यांपेक्षा जमातींकडे झुकलेली दिसते. इस्लामाबादला वाटले की तालिबान सत्तेवर आल्यावर टीटीपीवर नियंत्रण येईल; प्रत्यक्षात उलटे घडले. पाकिस्तानच्या वायव्य प्रांतात हल्ल्यांची तीव्रता वाढली. पाकिस्तानकडे पारंपरिक लष्करी बळ आहे, परंतु त्याचा सामना गनिमी डावपेचात तरबेज अशा शक्तींशी आहे.

अफगाणिस्तानात दोन महासत्तांना सोव्हिएत संघ आणि अमेरिकेला मागे हटवण्याचा अनुभव या लढवय्यांना आहे. अशा परिस्थितीत केवळ हवाई हल्ले हा दीर्घकालीन उपाय ठरू शकत नाही. उलट, प्रत्येक हल्ल्याने सीमाभागातील असंतोष अधिक भडकण्याची शक्यता आहे. या संघर्षाचे परिणाम दक्षिण आशियापुरते मर्यादित राहतील असे मानणे भोळेपणाचे ठरेल. प्रथम, प्रादेशिक अस्थिरतेचा थेट परिणाम दहशतवादी जाळ्यांच्या हालचालींवर होतो. जेव्हा राज्ये एकमेकांवर गोळीबार करतात, तेव्हा अराज्य घटकांना संधी मिळते. दुसरे म्हणजे, निर्वासितांचे संभाव्य लोंढे आणि सीमावर्ती अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम. पाकिस्तानने अफगाण नागरिकांबाबत घेतलेली कठोर भूमिका आधीच वादग्रस्त आहे. युद्धकाळात ती आणखी कठीण होईल. भारतासाठी हा प्रसंग निरीक्षकाची भूमिका घेऊन बसण्याचा नाही. भारताचे अफगाणिस्तानात पायाभूत सुविधा, मानवी मदत आणि राजनैतिक गुंतवणूक आहे. पाकिस्तानाशी तणावाचे समीकरण स्वतंत्र आहेच. त्यामुळे या संघर्षात भारताने संयमित पण जागरूक धोरण स्वीकारणे आवश्यक आहे.

पहिला मुद्दा म्हणजे प्रादेशिक संवादाला चालना देणे. थेट हस्तक्षेप नव्हे, पण बहुपक्षीय मंचांद्वारे तणाव कमी करण्याचा प्रयत्न. दुसरा मुद्दा म्हणजे दहशतवादविरोधी यंत्रणांची दक्षता. सीमापार अस्थिरता वाढली की अतिरेक्यांची हालचाल वाढते. तिसरा मुद्दा म्हणजे मानवतावादी दृष्टीकोन. अफगाण जनतेशी असलेले भारताचे ऐतिहासिक स्नेहबंध जपणे आवश्यक आहे. पाकिस्तानसाठीही हा संघर्ष आत्मपरीक्षणाचा क्षण आहे. सीमापार व्यापार मर्यादित करणे, पश्तून समुदायांवर कठोर धोरण लादणे आणि प्रत्येक सुरक्षा समस्येला भारताशी जोडणे ही दीर्घकालीन नीती ठरू शकत नाही.

ड्युरंड रेषेवरील वास्तव स्वीकारून राजनैतिक संवादाचा मार्ग पुन्हा उघडणे हेच अधिक शहाणपणाचे पाऊल ठरेल. युद्धाचा मोह नेहमी तात्कालिक राजकीय संदेश देतो; परंतु त्याचे दुष्परिणाम पिढ्यान्पिढ्या भोगावे लागतात. अफगाणिस्तान-पाकिस्तान संघर्ष ही दोन राष्ट्रांची लढाई नाही; ती दक्षिण आशियाच्या स्थैर्याची परीक्षा आहे. आज सीमारेषेवर जळणारी आग उद्या संपूर्ण प्रदेशाला वेढू शकते.

हा प्रसंग दूरदृष्टी, संयम आणि वास्तववादी मुत्सद्देगिरी यांची मागणी करतो. दक्षिण आशियातील शांतता ही नाजूक आहे; तिचे रक्षण तोफांच्या आवाजाने होत नाही. संवाद, परस्पर मान्यता आणि इतिहासातील धड्यांची जाणीव यांवरच तिचा पाया टिकू शकतो. आणि त्या पायाला तडा गेला तर त्याचे कंपन संपूर्ण उपखंडाला जाणवतील.

# विविध प्रश्नांवर अमित गोरखे आक्रमक

## अल्पसंख्याक महामंडळाच्या निधीसाठी आमदार अमित गोरखे सरसावले

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी विविध समाजघटकांच्या प्रलंबित प्रश्नांवरून सरकारला धारेवर धरले.

केवळ घोषणा करून चालणार नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. अण्णाभाऊ साठे महामंडळासाठी खंड हमी आणि निधीची मागणी मातंग समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी स्थापन करण्यात आलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळचा मुद्दा गोरखे यांनी विशेषत्वाने उपस्थित केला. महामंडळाची पाच वर्षांची खंड हमी संपुष्टात आल्याने ती तातडीने द्यावी आणि कामकाजासाठी स्वतंत्र १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच 'आर्टी' संस्थेसाठी २०० कोटी रुपयांची आवश्यकता असताना केवळ १० कोटींची तरतूद करण्यात आल्याची खंत व्यक्त करत उर्वरित १९० कोटी रुपये तात्काळ मंजूर करण्याची मागणीही त्यांनी केली.

राज्यातील डीएड पदवीधारकांच्या वाढत्या बेरोजगारीकडे लक्ष वेधताना गोरखे यांनी शिक्षक भरती प्रक्रियेत होत असलेल्या विलंबावर टीका केली. 'पवित्र' पोर्टलच्या संथ कारभारामुळे भरती रखडली असून त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

शिक्षक भरती तातडीने पूर्ण करावी, कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय पुनर्विचारात घ्यावा आणि शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेसाठी पुरेसा निधी द्यावा, अशा मागण्या त्यांनी केल्या. शालेय शिक्षण विभागासाठी त्यांनी लाक्षणिक मागणी सादर करत सरकारचे लक्ष वेधले.

राज्य सरकारने जाहीर केलेले जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ अद्याप निधीअभावी कार्यान्वित झालेले नसल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. संबंधित महामंडळाची घोषणा होऊनही प्रत्यक्षात कोणतीही आर्थिक तरतूद नसल्याने ते केवळ कागदावरच असल्याचे त्यांनी म्हटले. अल्पसंख्याक समाजातील तरुणांना आर्थिक सहाय्याची प्रतीक्षा असून सरकारने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली.

# स्वीकृत नगरसेवकांसाठी राष्ट्रवादीकडून तीन नावे

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाच्या स्वीकृत नगरसेवकपदासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट)कडून तीन नावे आयुक्तांकडे सादर करण्यात आली आहेत. माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, माजी नगरसेविका सीमा साळवे आणि शहर कार्याध्यक्ष फजल शेख यांची शिफारस करण्यात आली आहे. तर सत्ताधारी भारतीय जनता पक्षमध्ये नावांवर एकमत न झाल्याने मुदतवाढीची मागणी करण्यात आली आहे.

महापालिकेतील संख्याबळानुसार भाजपाचे सात आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तीन स्वीकृत नगरसेवक नियुक्त होणार आहेत. १३ मार्च रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर स्वीकृत नगरसेवक नियुक्तीचा विषय समाविष्ट करण्यात आला आहे.

आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी बुधवारी (दि. ४) दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत नावांची शिफारस सादर करण्याच्या सूचना सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे आणि विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांना दिल्या होत्या. त्यानुसार विरोधी पक्षनेते भोईर यांनी तिघांची नावे आयुक्तांकडे सादर केली. संबंधित तिघांचे अर्ज आयुक्तांनी वैध ठरवले आहेत.

राजेंद्र जगताप हे नवी सांगवी-पिंपळे गुरव प्रभाग क्रमांक ३१ मधून निवडणूक लढवून पराभूत झाले होते. सीमा साळवे या इंद्रायणीनगर-गवळीमाथा प्रभाग क्रमांक ८ मधून पराभूत झाल्या असून त्या भाजपातून राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये दाखल झाल्या.

# हरिनामाच्या गजरात संत तुकाराम महाराजांचा वैकुंठगमन सोहळा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**देहूगाव :** श्रीक्षेत्र देहू येथे संत तुकाराम महाराज यांच्या ३७८व्या सदेह वैकुंठगमन सोहळ्यानिमित्त लाखो वारकरी भाविकांची उपस्थिती लाभली आहे. हरिनामाच्या अखंड गजरात देहूनगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून दिंड्या दाखल होत असून खासगी वाहने, पीएमपी आणि एसटी महामंडळाच्या बसमधून भाविकांचा ओघ सुरू आहे.

इंद्रायणी घाट, मुख्य मंदिर, वैकुंठस्थान मंदिर आणि गाथा मंदिर परिसरात दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आहे. गाथा पारायण, हरिपाठ आणि टाळ-मृदंगाच्या निनादात देहू नगरी वैष्णवांच्या मेळ्याने फुलून गेली आहे. देहूकडे येणारे सर्व प्रमुख रस्ते पायी चालत येणाऱ्या वारकऱ्यांनी गजबजले आहेत. इंद्रायणी घाट परिसरात स्नानासाठी भाविकांची रांग लागली असून मंदिर परिसरात शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले आहे. हरिनामाच्या अखंड गजरात आजचा ऐतिहासिक सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने पार पडत आहे. "याच देही, याच डोळा" हा दिव्य सोहळा अनुभवण्यासाठी वारकरी भाविक आतुर झाले असून देहूनगरीत वैष्णवांचा मेळा फुलला आहे.

# 'मोगरा फुलला'मॉरिशस येथे यशस्वीरीत्या संपन्न

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पुणे :** संतसाहित्यावरील 'मोगरा फुलला' हाभव्य सांस्कृतिक सोहळा समुद्राच्या कुशीत वसलेल्या मॉरिशस येथे १ मार्च २०२६ रोजी सर्ज कॉन्स्टंटीन थिएटर येथे उत्साहात संपन्न झाला. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्मोत्सवानिमित्त आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या सुवर्णक्षणाच्या निमित्ताने हा विशेष उपक्रम स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनतर्फे आयोजित करण्यात आला होता.

यावेळी प्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे आणि प्रसिद्ध गायिका सिन्मिता धापटे-शिंदे यांनी संतसाहित्यावर आधारित व्याख्यान आणि संगीतमय सादरीकरण सादर केले. तसेच शुभांगी शिंदे यांनी 'मी महाराष्ट्र बोलतोय' हे प्रभावी स्वागत सादर केले. मराठी भाषेशी जोडणाऱ्या विविध उपक्रमांचा समृद्ध अनुभव रसिक प्रेक्षकांना मिळाला.

या कार्यक्रमाला मॉरिशसचे कला आणि संस्कृती मंत्री महेंद्र गोंदिया, मॉरिशस मराठी कल्चरल सेंटर ट्रस्टचे अध्यक्ष धनीराव भवाजी, मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशनचे अध्यक्ष बलराज नारू, मॉरिशस मराठी स्पीकिंग युनियनचे अध्यक्ष भालचंद्र गोविंद, स्वान फाऊंडेशनचे सचिव विकास टाकळीकर आणि सचिव श्री. प्रसादराजे भोपळे उपस्थित होते.

यावेळी स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशनचे अध्यक्ष शशिकांत कांबळे यांनी हा उपक्रम विविध देशांमध्ये नेण्याचा संकल्प व्यक्त केला. तसेच एप्रिल महिन्यात लंडन येथे डॉ. बी. आर. आंबेडकर डिबेट वर्ल्ड कप आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

'मोगरा फुलला' हा सोहळा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम ठरला नाही, तर जागतिक पातळीवर मराठी अस्मिता आणि भाषिक अभिमान यांचे प्रभावी दर्शन घडवणारा ऐतिहासिक क्षण ठरला. आधुनिकतेचा संगम साधत मराठी संस्कृतीचे जागतिक बंध दृढ करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. मराठी संस्कृतीची सुवासिक परंपरा सीमारेषा ओलांडून जगभर फुलत राहो, अशी भावना व्यक्त करण्यात आली.

## मनपाच्या पहिल्या स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मान्यता

# महापालिकेच्या उत्पन्न वाढीसह शहर प्रदूषणमुक्तीवर भर

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची आर्थिक स्थिती भक्कम करण्यासोबतच शहराच्या शाश्वत विकासासाठी 'इन्कम जनरेशन' आणि 'प्रदूषण नियंत्रण' या दोन सूत्रांवर भर दिला जाणार असल्याची माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज दिली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात आज स्थायी समितीची सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी अभिषेक बारणे होते. या बैठकीस आयुक्त श्रावण हर्डीकर, नगरसचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्यासह समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते. स्थायी समितीच्या बैठकीत विविध विषयांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत सभापती अभिषेक बारणे यांनी दिली.

बैठकीत मनपाच्या मुख्य लेखा विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जाला मंजुरी देण्यात आली. तसेच, महापालिकेच्या वतीने "मराठी भाषा गौरव दिना"निमित्त दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमासाठी यामध्ये कलाकार, वक्ते मानधन, सांस्कृतिक कार्यक्रम असा एकूण खर्च र. रु. ७,५०,०००/- (अक्षरी र.रु. सात लाख पन्नास हजार फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

शहरात सुरू असलेल्या बांधकामांच्या ठिकाणी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवले जात असल्याच्या तक्रारींची दखल घेत सभापती अभिषेक बारणे यांनी कडक पावले उचलली आहेत. "शहरात धुळीचे प्रमाण वाढू नये आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये, यासाठी बांधकाम सुरक्षा तपासण्यासाठी दोन विशेष पथके तैनात करण्याचे आदेश दिले आहेत. क्षेत्रीय कार्यालयांनी त्यांच्या हद्दीतील मोठ्या कामांची प्रगती आणि सुरक्षिततेची नियमित देखरेख करावी," असे निर्देश बारणे यांनी बैठकीत दिले.

आर्थिक नियोजनाबाबत बोलताना बारणे यांनी स्पष्ट केले की, सध्या पालिकेवर दायित्व (Liability) अधिक आहे. "नवीन कामांपेक्षा आधीचे प्रकल्प पूर्ण करणे आमचे प्राधान्य आहे. उपनगरांतील कर संकलन वाढवणे आणि होर्डिंग्जच्या माध्यमातून महसुलात भर टाकणे यावर आम्ही भर देत आहोत. निधी वाढल्यास शहराच्या वैभवात भर घालणारी कामे वेगाने होतील," असा विश्वास व्यक्त केला.

# दुबईत अडकलेले ८४ विद्यार्थी सुखरूप परत

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** इस्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यात संघर्ष भडकताच दुबईत अडकलेल्या ताथवडे येथील इंदिरा विद्यापीठच्या ८४ विद्यार्थ्यांची अखेर सुखरूप सुटका करण्यात आली. विशेष चार्टर विमानाच्या माध्यमातून हे सर्व विद्यार्थी मुंबईत दाखल झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले.

दुबईला शिक्षणासाठी गेलेले विद्यार्थी आणि दहा शिक्षक तेथेच अडकले होते. भारत-दुबई विमानसेवा बंद झाल्याने विद्यार्थ्यांना परत आणणे कठीण बनले होते. क्षेपणास्त्र हल्ल्यांच्या बातम्यांमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयाने तातडीने हालचाली सुरू केल्या. दुबईतील महाराष्ट्र मंडळाचे सोमनाथ पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या निवासस्थानी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

उपमुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना सुरक्षित परत आणण्याचे आश्वासन दिले. अवघ्या २४ तासांत चार्टर विमानाची व्यवस्था करण्यात आली. आवश्यक परवानग्यांसाठी संयुक्त अरब अमिराती प्रशासनाशी समन्वय साधण्यात आला. संध्याकाळी सात वाजता दुबईहून विमानाने उड्डाण केले आणि सर्व विद्यार्थी मुंबई विमानतळावर सुरक्षित उतरले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### भरधाव पिकअप पलटी; दोन होमगार्ड जखमी

**लोणी काळभोर :** सोलापूर महामार्गावर भरधाव वेगाने धावणारी पिकअप गाडी अचानक ब्रेक मारल्याने पलटी होऊन शेजारील कारला धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात बंदोबस्तावर तैनात असलेले दोन होमगार्ड किरकोळ जखमी झाले आहेत. संबंधित पिकअप चालकाविरुद्ध लोणी काळभोर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एमआयटी कॉर्नर येथे घडली. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, पुण्याकडून सोलापूरकडे जाणारी पिकअप भरधाव वेगात होती. एमआयटी कॉर्नरजवळ अचानक ब्रेक लावल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले आणि गाडी पलटी झाली. अपघाताच्या वेळी वाहतूक नियंत्रणासाठी बंदोबस्तावर दोन होमगार्ड तैनात होते. पिकअप पलटी झाल्यानंतर निर्माण झालेल्या गोंधळात ते दोघे जखमी झाले.

### लोणी काळभोरमध्ये एमआयटी विरुद्ध गाव

**लोणी काळभोर :** लोणी काळभोर परिसरात कचऱ्याचा प्रश्न अक्षरशः स्फोटक बनला असून तो आता थेट "एमआयटी प्रशासन विरुद्ध गावकरी" अशा उघड संघर्षात परिवर्तित झाला आहे. नदीपात्रात टाकलेल्या कचऱ्याला लागलेल्या आगीमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले, तर एमआयटी प्रशासनाने कचऱ्याच्या गाड्यांना बंदी घातल्यानंतर गावात कचऱ्याचे ढीग साचल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. या सर्व प्रकारामुळे हजारो नागरिक आणि विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले असून प्रशासन निष्क्रिय असल्याचा आरोप होत आहे.

लोणी काळभोर येथील मुळा-मुठा नदी पात्रात टाकलेल्या कचऱ्याला अचानक आग लागली. ही आग पुढील चार दिवस सतत धुमसत राहिली. या आगीतून निघणारे धुराचे लोट संपूर्ण परिसरात पसरले आणि हवेत विषारी घटकांचे प्रमाण वाढल्याची भीती व्यक्त करण्यात आली.

## निर्यात ठप्प झाल्याने उत्पादक अडचणीत

# चाकण बाजारात कांद्याचे दर कोसळले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण :** अमेरिका-इस्रायल-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आखाती देशांकडे होणारी कांद्याची निर्यात ठप्प झाल्याने राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. बुधवारी (दि. ४) चाकण बाजारात तब्बल १३ हजार पिशव्यांची आवक झाली असून, घाऊक बाजारात सरासरी दर अवघा १० रुपये प्रति किलोपर्यंत घसरल्याचे चित्र आहे.

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत चाकण येथील महात्मा फुले मार्केटमध्ये कांद्याचे दर आणखी घसरण्याची चिन्हे आहेत. चाकण परिसरातून मोठ्या प्रमाणावर कांदा आखाती देशांकडे निर्यात केला जातो. मात्र युद्धजन्य परिस्थितीमुळे दुबईसह प्रमुख आयात बाजारपेठा तात्पुरत्या बंद झाल्याने निर्यात साखळी विस्कळीत झाली आहे.

निर्यातदार कंपन्यांच्या माहितीनुसार, मुंबईतील जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण येथे निर्यातीसाठी सज्ज असलेले १५० हून अधिक कंटेनर अडकून पडले आहेत. दुबईतील व्यापारी सध्या माल स्वीकारण्यास पुढे येत नसल्याने कंटेनरमधील नाशवंत कांदा खराब होण्याची भीती व्यक्त होत आहे. दुबई ही भारतीय कांद्याची प्रमुख बाजारपेठ मानली जाते. विशेषतः महाराष्ट्रातील नाशिक, पुणे परिसरातील कांदा मोठ्या प्रमाणावर आखाती देशांत पाठविला जातो. मात्र जहाज वाहतूक, विमा प्रक्रिया आणि आयात व्यवहारांवर परिणाम झाल्याने निर्यात व्यवहार ठप्प झाले आहेत. परिणामी, व्यापारी आणि शेतकरी या दोघांचेही आर्थिक गणित बिघडले आहे.

खेड बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे यांनी सांगितले की, सध्या मिळणारा १० रुपयांचा दर हा उत्पादन खर्चाशी सुसंगत नाही. मजुरी, खत-औषधे, वाहतूक खर्च लक्षात घेतल्यास शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत आहे. कांदा नाशवंत असल्याने शेतकऱ्यांना मिळेल त्या दरात स्थानिक बाजारात विक्री करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. दरम्यान, दुबईतील जेबेल अली बंदर हे मध्यपूर्वेतील सर्वात मोठ्या बंदरांपैकी एक असून, तेथून शेतीमालाची आयात-निर्यात मोठ्या प्रमाणावर होते. गेल्या काही दिवसांपासून बंदर परिसरातील कामकाज विस्कळीत झाल्याने सुमारे २०० हून अधिक कंटेनर उतरवले गेले नसल्याची माहिती आहे. परिणामी, महाराष्ट्रातील ३०० हून अधिक कृषीमालाने भरलेले कंटेनर निर्यातीच्या प्रतीक्षेत आहेत.

निर्यात थांबल्याचा परिणाम बाजारावरही होत असून, आवक वाढल्याने दर आणखी कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे. केंद्र सरकारचे कांदा निर्यात धोरण आधीच अनिश्चित असल्याने आणि त्यातच युद्धामुळे निर्माण झालेली अडचण लक्षात घेता, शेतकऱ्यांवर पुन्हा आर्थिक संकट ओढवण्याची चिन्हे आहेत. कांद्याच्या दरातील घसरण ही केवळ बाजारातील चढउतार नसून, आंतरराष्ट्रीय घडामोडींचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचत असल्याचे या परिस्थितीतून स्पष्ट होत आहे.

## शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांचे यश



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतुर :** जगातील सर्वात मोठी रेडिओ दुर्बीण असलेल्या जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप (जी.एम.आर.टी.), खोडद (ता. जुन्नर) येथे विज्ञान दिनानिमित्त आयोजित विज्ञान प्रदर्शनात डुंबरवाडी येथील शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग च्या ए.आय. अँड एम.एल. विभागातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

ओम अहिरे, पृथ्वीराज जुंदरे, चेतन शेवाळे आणि सोहम सुंकी यांनी सादर केलेल्या "टिच कनेक्ट" या प्रकल्पाला राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला. ही स्पर्धा शनिवार आणि रविवार या दोन दिवसांत पार पडली. विज्ञान प्रदर्शनात देशभरातील १३० शाळा, २७० महाविद्यालये आणि २२ संशोधन संस्थांनी सहभाग नोंदविला होता. अशा व्यापक स्पर्धेत ए.आय. अँड एम.एल. विभागाच्या पहिल्याच बॅचने तृतीय क्रमांक पटकावणे ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

महाविद्यालयातील ए.आय. अँड एम.एल. अभियांत्रिकी शाखेची ही पहिली बॅच असून राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत मिळविलेले यश संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेला नवे बळ देणारे ठरले आहे. या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही संशोधन व नवकल्पनांसाठी प्रेरणा मिळाली आहे. या प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांना प्रा. पल्लवी घोलप आणि प्रा. सुमित लोहटे यांचे मार्गदर्शन लाभले.

# अरुंद मोरीमुळे वितरिकेचे पाणी शेतात; पिकांना धोका



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरण येथून सोडण्यात आलेल्या डाव्या कालव्याच्या घोड शाखेचे पाणी नागापूर गावाच्या हद्दीत पोहोचले असले, तरी वितरिका क्रमांक ३ वरील अरुंद मोरीमुळे पाण्याचा निचरा व्यवस्थित न झाल्याने ते थेट शेतकऱ्यांच्या शेतात घुसल्याची घटना गुरुवारी (दि. ५) सकाळी सहाच्या सुमारास मिंडे वस्ती येथे घडली.


प्रकाश मिंडे व अल्पेश मिंडे यांच्या जनावरांच्या गोठ्यात पाणी शिरल्याने जनावरांना अडचणींचा सामना करावा लागला. त्यांच्या कांदा पिकात पाणी साचल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे सोमनाथ मिंडे यांच्या शेतातही पाणी घुसले असून दत्तात्रेय आसवले यांच्या फ्लॉवर पिकालाही पाण्याचा फटका बसण्याची भीती आहे. अचानक आलेल्या पाण्यामुळे शेतकऱ्यांना सकाळीच धावपळ करावी लागली.

स्थानिक शेतकरी सोमनाथ मिंडे यांनी सांगितले की, वितरिका क्रमांक ३ मधून पाणी वाहून जाण्यासाठी बसविण्यात आलेली मोरी अत्यंत अरुंद आहे. त्यामुळे पाण्याचा योग्य निचरा होत नाही आणि पाणी ओसंडून शेतात जाते. यापूर्वीही तीन ते चार वेळा अशाच घटना घडल्या असूनही पाटबंधारे विभागाने कायमस्वरूपी उपाययोजना केलेली नाही, असा आरोप त्यांनी केला.

# डी.पी. चोरांचा छडा लावण्यासाठी आंदोलन

## विजयसिंह शिंदे पाटील यांच्या नेतृत्वाखाली एमएसईबी कार्यालय व खेड पोलीस ठाण्यात धडक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** खेड तालुक्यात रोहित्र (डी.पी.) फोडून त्यातील तांब्याच्या तारा चोरी करण्याच्या घटनांत वाढ झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर वीजपुरवठा खंडित होत असल्याने पिकांचे मोठे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर जि.प. सदस्य तथा सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी बुधवारी (दि. ४) राजगुरुनगर येथील वीज वितरण कार्यालयाला घेराव घातला.

भोसे, पिंपळगाव, मरकळ, दावडी, बहुळ आदी गावांतील शेतकरी व नागरिकांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) अधिकाऱ्यांना जाब विचारत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. वीजपुरवठा पूर्ववत करण्यात होत असलेल्या दिरंगाईबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

त्यानंतर कार्यकर्त्यांनी खेड पोलीस ठाणे येथे जाऊन पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांची भेट घेतली. रोहित्र चोरीच्या वाढत्या घटनांवर आळा घालण्यासाठी ठोस कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, गेल्या वर्षभरात तालुक्यात ५०० हून अधिक रोहित्र फोडण्यात आले आहेत. मात्र, एकाही प्रकरणात ठोस तपास किंवा अटक झालेली नाही. परिणामी, मुबलक पाणी उपलब्ध असूनही वीज नसल्याने पिकांना पाणी देता येत नाही. अनेक शेतकऱ्यांना हातातोंडाशी आलेले पीक सोडून द्यावे लागत असून आर्थिक संकट तीव्र होत आहे.

**प्रमुख मागण्या**

- रोहित्र चोरीच्या घटनांचा तपास करून दोषींना अटक करावी
- पूर्ण दाबाने आणि अखंडित वीजपुरवठा करावा
- पडझडीच्या स्थितीत असलेले विजेचे खांब तातडीने बदलावेत
- प्रत्यक्ष मीटर रिडींग घेऊनच बिल आकारणी करावी

# तिन्हेवाडीतील विद्यार्थ्यांना साहित्य वाटप



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड येथील तिन्हेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक १ व क्रमांक २ मधील २१० विद्यार्थ्यांनाहिंदुस्तान फीड्स प्रायव्हेट लिमिटेड या पशुखाद्य उत्पादक कंपनीच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) उपक्रमांतर्गत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमात विद्यार्थ्यांना मोफत जेवणाचे डबे, डब्यांच्या पिशव्या तसेच बिस्किटांचे पुडे देण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या पोषण स्थितीत सुधारणा व्हावी आणि शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कंपनीकडून सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून अशा प्रकारच्या उपक्रमांची सुरुवात करण्यात आली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी कंपनीचे व्यवस्थापक मच्छिंद्र महाजन, डॉ. वाय. डी. चौगुले, पोलीस उपनिरीक्षक भूषण सांडभोर तसेच स्वामी समर्थ पशुखाद्य वितरक आलोकसिंह सांडभोर यांनी केली.

यावेळी तिन्हेवाडीच्या सरपंच प्रतीक्षा पाचारणे, उपसरपंच विठ्ठल वरकड, सदस्य बाळासाहेब सांडभोर, सदस्या कविता आरूडे, सदस्य नवनाथ वरकड, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश आरूडे, मुंबई पोलीस प्रसाद सांडभोर, उद्योजक सुरज सांडभोर, ओंकार सांडभोर यांच्यासह मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या हितासाठी सामाजिक कार्यक्रमांना पाठिंबा देण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.

## मेट्रोच्या नावाखाली फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी काळभोर :** पुणे मेट्रो प्रकल्पासाठी सिमेंट व स्टील पुरवठा करण्याच्या नावाखाली मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका दाम्पत्याची तब्बल ३ कोटी ७८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाणे येथे दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संतोष सुरेश काकडे (रा. राहींजवस्ती, लोणी काळभोर, ता. हवेली) आणि अतुल पवार अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी प्रिती विनोद जैन (वय ४२, व्यवसाय – नोकरी, रा. कृषीतंत्र विद्यालय, मांजरी फार्म, मांजरी बु.) यांनी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. पोलिसांनी संबंधितांविरुद्ध फसवणूकीचा गुन्हा दाखल केला

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात ट्रॅडिशनल डे उत्साहात



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालय येथे पारंपरिक दिवस (ट्रॅडिशनल डे) विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागात साजरा करण्यात आला. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, पॉलिटेक्निक आणि एमबीए कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थापक अध्यक्ष साहेबराव बुट्टेपाटील यांच्या पुतळ्यास विद्यार्थ्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर महाविद्यालय परिसरात पारंपरिकतेचा आणि विविधतेचा रंगोत्सव खुलला.

ट्रॅडिशनल डे निमित्त विद्यार्थ्यांनी पौराणिक, ऐतिहासिक तसेच विविध प्रादेशिक वेशभूषा परिधान करून आपले वेगळेपण सादर केले. मराठी, गुजराती, बंगाली, राजस्थानी आणि दाक्षिणात्य पोशाखांमधून विविध संस्कृतींचे दर्शन घडले.

पारंपरिक वाद्यांच्या तालावर विद्यार्थ्यांनी ठेका धरत सांस्कृतिक रंगत वाढवली. पारंपरिक वेशभूषेतील रॅम्प वॉक हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला. महाविद्यालयातील तरुणाई विविध रंगांच्या वेशभूषा आणि रंगभूषेत सजल्याने संपूर्ण परिसर उत्सवी वातावरणाने नटला होता.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, डॉ. पायल ओसवाल, प्रा. प्रियंका बालघरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. योगेश वाळुंज आणि डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. दिलीप मुळूक यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रा बोऱ्हाडे, श्रुती हुंडारे, वैष्णवी शिंदे, स्मितल दरेकर, छकुली केदारी, आयुष गायकवाड, अभिषेक घाटे, आयुष बच्चे, जयेश बालघरे, शुभम खरडे, शुभम पवार, यश थिगळे आणि आदित्य बोरसे या विद्यार्थ्यांनी केले.

## राज्यातील साखर उद्योगांसमोर आर्थिक अडचणी

# उपाययोजनांचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांकडे पाठविणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**इंदापूर :** राज्यातील साखर उद्योगासमोरील आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी विविध उपाययोजनांचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्याचा निर्णय सहकार विभागाच्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ, नवी दिल्लीचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

मुंबई येथे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बैठक पार पडली.

या बैठकीत चालू गळीत हंगामातील साखर कारखान्यांकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देय असलेली सुमारे ५५०० कोटी रुपयांची एफआरपी रक्कम अदा करणे, कारखान्यांवरील कर्जाचे पुनर्गठन करणे आदी मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.

बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, एफआरपीची थकबाकी भागविण्यासाठी राज्य शासनाने इतर राज्यांच्या धर्तीवर प्रति टन ५०० रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच साखर कारखान्यांकडे असलेल्या सुमारे १५ हजार कोटी रुपयांच्या कर्जाचे १० वर्षांसाठी पुनर्गठन करण्यात यावे. या पुनर्गठनात निम्मे व्याज कारखान्यांनी आणि उर्वरित निम्मे व्याज सरकारने उचलावे, असा प्रस्ताव मांडण्यात आला. याशिवाय जलसंपदा विभागाने वाढविलेली पाणीपट्टी तत्काळ रद्द करावी, सहवीज निर्मिती प्रकल्पांतून महावितरणला पुरविण्यात येणाऱ्या विजेसाठी प्रति युनिट १.५० रुपये अनुदान सुरू ठेवावे, तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून होणाऱ्या अडचणींसंदर्भात वरिष्ठ स्तरावर बैठक घेण्यात यावी, अशा मागण्या मांडण्यात आल्या.

सर्व मागण्यांचा प्रस्ताव सहकार मंत्र्यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविण्याचे ठरले. तसेच या विषयावर पुढील आठवड्यात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत बैठक आयोजित करण्याबाबत विनंतीपत्र देण्यात येणार असल्याचे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

या बैठकीस जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जयंतराव पाटील, प्रकाशराव सोळंकी, प्रताप ओहोळ, डॉ. पांडुरंग राऊत, राजवर्धन पाटील यांच्यासह साखर आयुक्त आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# पारगाव प्राथमिक शाळेची अंकेक्षण पथकाकडून तपासणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा अभियान अंतर्गत शाळांना मिळणाऱ्या विविध अनुदानांचा विनियोग, तसेच उपलब्ध भौतिक सुविधांचा सखोल आढावा घेण्यासाठी सुरू असलेल्या सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेअंतर्गत पारगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दोन दिवसीय तपासणी नुकतीच पार पडली.

शिक्षण विभागामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या केंद्रीय पथकातील छाया सुनील गावंडे आणि संध्या ज्ञानेश्वर जांभुळे यांनी शाळेची प्रत्यक्ष पाहणी करून नोंदी व कागदपत्रांची छाननी केली. शाळेला प्राप्त झालेल्या निधीचा वापर शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि नियोजित उद्दिष्टांसाठी झाला आहे का, याची सविस्तर तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान वर्गखोल्यांची स्थिती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, हँडवॉश स्टेशन, तसेच संरक्षण भिंत यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेताना राज्य शासनाच्या निपुण महाराष्ट्र उपक्रमाची अंमलबजावणी, तसेच 'विद्यार्थी सुरक्षा' विषयक उपाययोजनांची पडताळणी करण्यात आली.

## सारांश वृत्त

### जबलपूरमध्ये दोन गटांमध्ये हाणामारी

**जबलपूर:** मध्य प्रदेशातील जबलपूरमध्ये दोन गटांमध्ये झालेल्या संघर्षात एका २० वर्षीय तरुणाला दुखापत झाली, ज्यामुळे अधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने पोलिस तैनात केले, असे अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले. बुधवारी रात्री छोटी ओमटी परिसरात ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुन्या वैमनस्यातून एकाच समुदायातील दोन गटांनी एकमेकांना लक्ष्य केले.

### अरुवनकाडू कारखान्यात सायरन

**उधगमंडलम :** नीलगिरी जिल्ह्यातील अरुवनकाडू येथील संरक्षण कारखान्यात गुरुवारी कारखान्याच्या अधिकाऱ्यांनी आपत्कालीन सायरन वाजवून कामगारांना तात्काळ परिसर रिकामा करण्यास सांगितल्यानंतर तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. अधिकाऱ्यांनी सार्वजनिक भाषण प्रणालीचा वापर करून कामगारांना परिसरातून बाहेर पडण्यास सांगितले, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. आपत्कालीन सायरन वाजवण्याचे नेमके कारण कळू शकले नसले तरी, पोलिसांनी सांगितले की लष्कराचे अधिकारी आणि पोलिसांचे एक पथक अरुवनकाडू येथील कॉर्डाइट कारखान्यात चौकशीसाठी दाखल झाले.




### बुद्ध मूर्ती चोरताना पर्यटकाला अटक

**इटानगर :** पश्चिम बंगालमधील एका पर्यटकाला अरुणाचल प्रदेशात तवांग मठासह दोन प्रमुख स्थळांमधून धार्मिक वस्तू चोरल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. तवांगचे उपपोलिस अधीक्षक काटो तासो म्हणाले की, चोरीचे सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ५४ वर्षीय व्यक्तीचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेण्यात आले. देशातील सर्वात मोठ्या मठ असलेल्या तवांग मठातून बुद्ध मूर्ती चोरीला गेली. जायंट बुद्ध स्टॅच्यू पार्कमधून टिंगशा झांज आणि दोन धातूचे बटर दिवे चोरीला गेले, असे त्यांनी सांगितले.

## अमेरिकेने कराची-लाहोरमधील कर्मचाऱ्यांना परत बोलावले

# इराणी युद्धनौकेवर अमेरिकेचा हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** फेब्रुवारीच्या मध्यात विशाखापट्टणम येथे पार पडलेल्या भारतीय नौदलाच्या आंतरराष्ट्रीय फ्लीट रिव्ह्यू आणि 'सराव मिलान'मध्ये सहभागी झालेल्या इराणी नौदलाच्या एका फ्रिगेटला बुधवारी हिंद महासागरात अमेरिकन अणुऊर्जेवर चालणाऱ्या हल्ला पाणबुडीने डागलेल्या टॉर्पेडोचा फटका बसला. अमेरिका - इस्रायल - इराण यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या सागरी शेजारात घडलेली ही घटना भू-राजकीयदृष्ट्या धोक्याची घंटा मानली जात आहे.

अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेग-सेथ यांनी दिलेल्या माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय पाण्यात गस्त घालणाऱ्या अमेरिकन पाणबुडीने इराणी युद्धनौकेवर टॉर्पेडो डागला.



"दुसऱ्या महायुद्धानंतर टॉर्पेडोने शत्रूचे जहाज बुडवण्याची ही पहिलीच घटना आहे," असे त्यांनी नमूद केले. १९८२ मधील फॉकलंड युद्ध आणि १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्ध काळात टॉर्पेडोचा वापर झाला होता; मात्र अलीकडच्या दशकांत अशी थेट कारवाई झालेली नव्हती.

हल्ल्यानंतर लगेचच 'आयआरआयएस देना' या फ्रिगेटकडून आपत्तीचा संदेश देण्यात आला. त्यानंतर शोध व बचाव मोहीम सुरू करण्यात आली. सुमारे १८० जणांच्या ताफ्यातील ३२ जखमी खलाशांना वाचवण्यात यश आले असून ८७ जणांचा मृत्यू झाल्याची अधिकृत पुष्टी करण्यात आली आहे. डझनभर खलाशी बेपत्ता असल्याने मृतांचा आकडा शंभरच्या पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

ही फ्रिगेट भारतीय नौदलाने आयोजित केलेल्या कार्यक्रमांत सहभागी झाल्यानंतर इराणकडे परतीच्या प्रवासावर होती. पर्शियन आखाताकडे रवाना होण्यापूर्वी कोची येथे इंधन भरण्याचा तिचा मानस होता, अशी माहिती सूत्रांनी दिली. जहाजाने आपत्कालीन संदेश पाठवला तेव्हा ते गॅलेच्या दक्षिणेस सुमारे ४० नॉटिकल मैलांवर, श्रीलंकेच्या प्रादेशिक पाण्याबाहेर होते.

श्रीलंका नौदलाने तातडीने जहाजे व विमाने पाठवून बचावकार्य हाती घेतले. श्रीलंकेच्या हवाई दलानेही कारवाईत सहभाग घेत जखमी खलाशांना बाहेर काढले. श्रीलंकेचे परराष्ट्र मंत्री विजिता हेराथ यांनी संसदेत माहिती देताना सांगितले की, जखमींना विविध रुग्णालयांत हलवण्यात आले आहे. श्रीलंकेच्या नौदलाचे प्रवक्ते बुद्धिका संपत यांनी स्पष्ट केले की, ही मोहीम आंतरराष्ट्रीय सागरी दायित्वांच्या अनुषंगाने राबवण्यात आली.

दरम्यान, नवी दिल्लीतील अमेरिकन दूतावासाने यापूर्वी दिलेल्या माहितीनुसार, 'यूएसएस पिंकनी' ही आर्ले बर्क-श्रेणीची युद्धनौका आंतरराष्ट्रीय फ्लीट रिव्ह्यू आणि सराव मिलानमध्ये सहभागी होणार होती; मात्र तातडीच्या कार्यकारी कारणांमुळे ती हजर राहू शकली नव्हती. त्याऐवजी अमेरिकेने पी-८ सागरी गस्त विमान तैनात केले होते.

इराणी नौदलाचे प्रमुख शाहराम इराणी हे देखील विशाखापट्टणम येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय फ्लीट रिव्ह्यू, इंडियन ओशन नेव्हल सिम्पोजियम चीफ्स कॉन्क्लेव्ह आणि सराव मिलानमध्ये सहभागी झाले होते. त्यामुळे या हल्ल्याचे परिणाम केवळ अमेरिका-इराण संबंधांपुरते मर्यादित न राहता व्यापक सागरी सुरक्षेच्या समीकरणांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हिंद महासागर क्षेत्रात भारत, अमेरिका, इराण आणि इतर सागरी शक्तींची वाढती उपस्थिती लक्षात घेता, या घटनेमुळे व्यापारी जहाजवाहतूक, ऊर्जा पुरवठा मार्ग आणि प्रादेशिक स्थैर्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आंतरराष्ट्रीय पाण्यात घडलेल्या या हल्ल्यामुळे भविष्यातील सागरी संघर्षाचे स्वरूप अधिक आक्रमक होण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

# मोदी हे तडजोड केलेले पंतप्रधान : राहुल गांधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर तीव्र टीका केली. पश्चिम आशियातील संघर्ष आता भारताच्या अंगणात पोहोचला असताना पंतप्रधान मौन बाळगत आहेत, असा आरोप त्यांनी केला. देशाला स्थिर नेतृत्वाची गरज असताना "धोरणात्मक स्वायत्तता सोडून दिलेले तडजोडीचे पंतप्रधान" देशाच्या नेतृत्वस्थानी असल्याचे ते म्हणाले.

'एक्स'वरील पोस्टमध्ये गांधी यांनी जागतिक परिस्थितीवर भाष्य करताना, "जग अस्थिर टप्प्यात प्रवेश करत आहे. पुढे वादळी समुद्र उभे आहेत," असे म्हटले. भारताच्या ऊर्जा सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करत त्यांनी नमूद केले की, भारताच्या ४० टक्क्यांहून अधिक तेल आयात होर्मुझची सामुद्रधुनी मार्गे होते. "एलपीजी आणि एलएनजीसाठी परिस्थिती आणखी गंभीर आहे," असे ते म्हणाले. हिंद महासागरात इराणी युद्धनौका बुडाल्याच्या घटनेचा उल्लेख करत गांधी यांनी सांगितले की, "संघर्ष आता आपल्या अंगणात पोहोचला आहे. तरीही पंतप्रधानांनी कोणतीही स्पष्ट भूमिका मांडलेली नाही." अशा वेळी भारताला ठाम आणि स्वायत्त परराष्ट्र धोरणाची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. त्यांचे हे वक्तव्य श्रीलंकेच्या किनाऱ्याजवळ आंतरराष्ट्रीय पाण्यात अमेरिकन पाणबुडीने 'आयआरआयएस देना' या इराणी युद्धनौकेला टॉर्पेडोने लक्ष्य केल्याच्या घटनेनंतर आले आहे. ही युद्धनौका भारतात आयोजित बहुपक्षीय 'मिलान' नौदल सरावात सहभागी होऊन परतत होती.

गेल्या काही दिवसांत हल्ले आणि प्रतिहल्ल्यांच्या मालिकेमुळे परिस्थिती अधिक चिघळली आहे. या पार्श्वभूमीवर भारताने संवाद आणि राजनैतिक मार्गाने तोडगा काढण्याचे आवाहन केले आहे. हिंद महासागरातील सागरी सुरक्षेच्या दृष्टीनेही ही घडामोड गंभीर मानली जात असून भारताच्या ऊर्जा आणि सामरिक हितसंबंधांवर त्याचे परिणाम होऊ शकतात, अशी चर्चा सुरू आहे.

# दबावाला न जुमानता निर्णय घ्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोची :** सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न यांनी न्यायाधीशांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता योग्य निर्णय घेण्याचे धैर्य दाखवावे, असा स्पष्ट संदेश दिला. केरळ उच्च न्यायालयात आयोजित दुसऱ्या टी.एस. कृष्णमूर्ती अय्यर स्मृती व्याख्यानात त्या बोलत होत्या.

मंगळवारी व्याख्यानादरम्यान त्यांनी नमूद केले की, "न्यायाधीशांनी योग्य निर्णय घेण्यास मागेपुढे पाहू नये, जरी तो त्यांच्या प्रगतीत अडथळा आणणारा किंवा सत्ताधाऱ्यांना अप्रिय ठरणारा असला तरी." न्यायाधीशाने राजकीय दबाव, संस्थात्मक धमक्या किंवा लोकप्रिय मागणीपासून पूर्णपणे मुक्त राहिले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यापूर्वीही न्यायमूर्ती नागरत्न यांनी माध्यमांच्या स्वातंत्र्याबाबत ठाम भूमिका मांडली होती. आयपीआय इंडिया अवॉर्ड्स फॉर एक्सलन्स इन जर्नलिझम २०२५ या पुरस्कार सोहळ्यात त्यांनी सांगितले की, प्रेसवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न केवळ आर्थिक कारणांनी होत नाहीत; त्यामागे राजकीय घटकांचाही प्रभाव असतो.

त्या म्हणाल्या की माध्यमे कोणत्याही प्रकारच्या धमकी, भीती किंवा प्रभावाखाली असतील तर ती लोकशाहीतील आपली भूमिका प्रभावीपणे बजावू शकत नाहीत. आज प्रेस स्वातंत्र्यासमोरील सर्वात मोठा धोका थेट सेन्सॉरशिप नसून आर्थिक धोरणे, कठोर परवाना नियम आणि मीडिया कंपन्यांच्या मालकीतील संरचनात्मक बदल आहेत, असे त्यांनी अधोरेखित केले.

"एखादी माध्यम संस्था कायदेशीरदृष्ट्या सरकारवर टीका करण्यास स्वतंत्र असू शकते; मात्र आर्थिक बंधनांमुळे अशी टीका करणे तिला महागात पडू शकते," असे त्या म्हणाल्या. या निरीक्षणातून त्यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीतील गुंतागुंत स्पष्ट केली.

# राज्यसभेत एनडीएचे संख्याबळ वाढणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने महाराष्ट्रातून राज्यसभेसाठी चार उमेदवारांची घोषणा केली आहे. १६ मार्च रोजी होणाऱ्या ३७ जागांसाठीच्या निवडणुकांमध्ये एनडीएला संख्याबळ वाढवण्याची संधी असल्याचे चित्र आहे.

सध्या राज्यसभेतील संबंधित ३७ जागांपैकी १२ जागा एनडीएकडे असून २५ जागा विरोधकांकडे आहेत. मात्र बिहार, ओडिशा आणि महाराष्ट्रसारख्या राज्यांमध्ये विधानसभेतील संख्याबळ बदलल्याने एनडीएला फायदा होण्याची शक्यता आहे. या ३७ पैकी सुमारे २१ जागा एनडीएच्या खात्यात जाण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. एकूण २४५ सदस्यांच्या राज्यसभेत यंदा ७२ सदस्यांचा कार्यकाळ संपणार आहे. त्यापैकी महाराष्ट्र, ओडिशा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणा या दहा राज्यांतील ३७ जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार आहे. उर्वरित जागा पुढील काही महिन्यांत रिक्त होतील. या दहा राज्यांपैकी सहा राज्यांत सध्या एनडीए सत्तेत आहे. राज्यसभेत भाजप १०३ सदस्यांसह सर्वात मोठा पक्ष आहे. तर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील विरोधी पक्षांकडे सुमारे ८० सदस्य आहेत. एप्रिलमध्ये महाराष्ट्रातून सात, तामिळनाडूतून सहा, पश्चिम बंगाल व बिहारमधून प्रत्येकी पाच, ओडिशातून चार, आसाममधून तीन, तेलंगणा, छत्तीसगड व हरियाणामधून प्रत्येकी दोन, तर हिमाचल प्रदेशातून एक जागा रिक्त होणार आहे.

महाराष्ट्रातून निवृत्त होणाऱ्यांमध्ये शरद पवार, रामदास आठवले, फौजिया खान, रजनी पाटील, प्रियंका चतुर्वेदी, तसेच भाजपचे धनंजय पाटील आणि भागवत कराड यांचा समावेश आहे. महाराष्ट्रात सध्या महायुतीचे सरकार असल्याने एनडीएला सर्व सहा किंवा सातही जागा जिंकण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बिहार विधानसभेत बहुमत असल्यामुळे तेथून पाच जागा एनडीएच्या खात्यात जाण्याची शक्यता आहे.

पश्चिम बंगालमध्ये मात्र तृणमूल काँग्रेस सत्तेत असल्याने भाजपला केवळ एक जागा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे, तर उर्वरित चार जागा तृणमूल काँग्रेस जिंकेल, असा अंदाज आहे. महाराष्ट्रातून भाजपने राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यासह रामदास आठवले, माया चिंतामण इवनाटे आणि रामराव वडकुते यांची नावे जाहीर केली आहेत.

# हिमाचल प्रदेशमध्ये काँग्रेसची सावध भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चंदीगड :** १६ मार्च रोजी होणाऱ्या राज्यसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने हिमाचल प्रदेशातून कांगडा जिल्हा पक्षप्रमुख अनुराग शर्मा आणि हरियाणामधून अनुसूचित जातीचे नेते करमवीर सिंह बौद्ध यांना उमेदवारी जाहीर केली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची आज अंतिम तारीख होती.

मागील अनुभवाच्या पार्श्वभूमीवर



यावेळी काँग्रेसने सावध भूमिका घेतल्याचे दिसून येते. २०२४ मध्ये विधानसभेत ४० आमदार आणि तीन अपक्षांचा पाठिंबा असूनही काँग्रेसचे उमेदवार अभिषेक मनु सिंघवी यांचा पराभव झाला होता. सहा बंडखोर आमदार आणि तीन अपक्षांनी क्रॉस-व्होटिंग केल्यामुळे भाजपचे हर्ष महाजन विजयी झाले. त्यानंतर संबंधित सर्व नऊ आमदार भारतीय जनता पक्षमध्ये दाखल झाल्याने राज्यात राजकीय अस्थिरता निर्माण झाली होती. ६८ सदस्यांच्या हिमाचल प्रदेश विधानसभेत काँग्रेसचे ४० आणि भाजपचे २८ आमदार आहेत. या गणितामुळे सत्ताधारी पक्षाला ही जागा जिंकण्यासाठी अनुकूल स्थिती आहे. राज्यातील तीनही राज्यसभा जागा सध्या भाजपकडे आहेत. भाजपच्या खासदार इंदू बाला गोस्वामी यांचा कार्यकाळ ९ एप्रिल रोजी संपत असल्याने ही निवडणूक होत आहे.

राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने स्थानिक नेतृत्वाला संधी देत पक्षातील अंतर्गत समीकरणे सांभाळण्याचा प्रयत्न केल्याचे राजकीय वर्तुळात मानले जात आहे. आगामी मतदानात क्रॉस-व्होटिंग टाळणे हे सत्ताधारी पक्षापुढील प्रमुख आव्हान राहणार आहे.

## काँग्रेसकडून 'जनादेशाचा विश्वासघात' आरोप

# नितीश कुमारांचे राज्यसभेचे ठरले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाटणा :** बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी दोन दशकांहून अधिक काळ सांभाळलेले मुख्यमंत्रीपद सोडून राज्यसभेत जाण्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या निर्णयाबाबत सुरू असलेल्या अटकळांना पूर्णविराम देत त्यांनी सामाजिक माध्यम 'एक्स'वर याची अधिकृत घोषणा केली.

"माझ्या संसदीय प्रवासाच्या सुरुवातीपासूनच बिहार विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसह संसदेच्या दोन्ही सभागृहांचा सदस्य होण्याची इच्छा होती. त्या आकांक्षेनुसार, यावेळी होणाऱ्या निवडणुकीत राज्यसभेचा सदस्य होण्यासाठी प्रयत्न करत आहे," असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले.

गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये विक्रमी दहाव्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतलेल्या ७५ वर्षीय नेत्याने राज्यातील जनतेचे आभार मानले. "दोन दशकांहून अधिक काळ तुम्ही माझ्यावर सातत्याने विश्वास ठेवला. त्या विश्वासाच्या बळावर आम्ही बिहारची सेवा केली. आज बिहारला विकास आणि प्रतिष्ठेचा नवा आयाम सादर करता आला आहे," असे त्यांनी लिहिले.



जनता दल (युनायटेड)चे अध्यक्ष असलेल्या कुमार यांनी नव्या सरकारला पूर्ण सहकार्य व मार्गदर्शन देण्याचे आश्वासन दिले. "भविष्यातही तुमच्याशी माझे संबंध कायम राहतील. विकसित बिहारच्या उभारणीसाठी माझा संकल्प दृढ राहील," असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, त्यांच्या या निर्णयानंतर पक्षातच अस्वस्थता निर्माण झाली आहे. विशेषतः त्यांच्या मूळ नालंदा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी पाटणा येथील ॲन मार्गवरील अधिकृत निवासस्थानाबाहेर जमून निषेध नोंदवला. निदर्शनादरम्यान जदयू नेते राजीव रंजन पटेल यांनी भावनिक प्रतिक्रिया देताना, "नितीश कुमार यांच्याशिवाय दुसरे कोणीही मुख्यमंत्री म्हणून मान्य नाही," असे सांगितले. निर्णयाची बातमी समोर आल्यानंतर होळी साजरी न केल्याचा उल्लेखही काही कार्यकर्त्यांनी केला. "ही बातमी आल्यानंतर आमची होळी उद्ध्वस्त झाली," असे त्यांनी सांगितले. महिलांनी मोठ्या संख्येने मतदान करून कुमार यांना पाठिंबा दिल्याचे सांगत महिला कार्यकर्त्यांनीही त्यांना पदावर कायम ठेवण्याची मागणी केली.

दरम्यान, या घडामोडींवर काँग्रेसने तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी या निर्णयाला "बंड" आणि "जनतेच्या जनादेशाचा मोठा विश्वासघात" असे संबोधले. "निवडणूक प्रचारादरम्यान आम्ही ज्या शंकेची व्यक्ती केली होती, ती खरी ठरली. सत्तापालटाच्या माध्यमातून बिहारमध्ये जनादेशाला धक्का देण्यात आला आहे," असे त्यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले.

# खामेनी हत्येविरोधात काश्मीरमध्ये निर्बंध कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** काश्मीरमध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येविरोधात सुरू असलेल्या निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर कडक सुरक्षा निर्बंध कायम ठेवण्यात आले. दरम्यान, नॅशनल कॉन्फरन्सचे लोकसभा खासदार आगा रुहुल्लाह आणि श्रीनगरचे माजी महापौर जुनैद मट्टू यांच्याविरुद्ध सोशल मीडियावरील पोस्टप्रकरणी पोलिसांनी एफआयआर नोंदवला आहे.

श्रीनगरसह संवेदनशील



भागांमध्ये पोलिस व निमलष्करी दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या असून मुख्य रस्त्यांवर तारांचे बॅरिकेड्स आणि चिलखती वाहने उभी करण्यात आली आहेत. शिया बहुल भागांमध्ये कोणताही निषेध होऊ नये यासाठी विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. खासगी वाहनांना मर्यादित परवानगी देण्यात आली असली तरी सार्वजनिक वाहतूक मोठ्या प्रमाणात ठप्प आहे.

रविवारी झालेल्या मोठ्या निदर्शनांनंतर शहरातील मध्यवर्ती लाल चौक परिसर सील करण्यात आला. ऐतिहासिक घंटाघर नागरिकांसाठी बंद ठेवण्यात आले असून त्या ठिकाणी इराणी ध्वज फडकवण्यात आल्याचेही निदर्शनास आले. तणावाच्या पार्श्वभूमीवर ७ मार्चपर्यंत खोऱ्यातील सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. काही परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत पोलिसांनी 'फेक न्यूज' आणि दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करणाऱ्या सोशल मीडिया खात्यांवर कारवाई सुरू केली आहे. निदर्शनांमध्ये सहभागी झालेल्या अनेक व्यक्तींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## इराणवरील हल्ल्यांवर फारुख यांची टीका

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांनी गुरुवारी इराणवरील अमेरिका-इस्रायल हल्ल्यांवर टीका केली आणि म्हटले की कोणत्याही देशाला दुसऱ्या राष्ट्रावर आपले नियंत्रण लादण्याचा अधिकार नाही. नॅशनल कॉन्फरन्सच्या अध्यक्षांनी असेही म्हटले की, इराण आणि इस्रायलमधील सुरू असलेल्या संघर्षावर आपली भूमिका मांडणे ही केंद्र सरकारची जबाबदारी आहे. इराण हा एक स्वतंत्र देश आहे. अमेरिकेने त्यावर हल्ला केला; ते चुकीचे आहे.

# वैवाहिक छळ हा सतत होणारा गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोची :** वैवाहिक जीवनातील क्रूरता आणि हुंड्यासाठीचा छळ हा एक "सतत चालणारा गुन्हा" आहे. त्यामुळे केवळ तक्रार नोंदवण्यास विलंब झाला, या तांत्रिक कारणावरून पतीविरुद्धचा गुन्हा फेटाळता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय केरळ उच्च न्यायालयाने दिला आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, संबंधित प्रकरणात पती आणि सासूवर हुंड्यासाठी छळ केल्याचा आरोप होता. कनिष्ठ न्यायालयाने पतीला दोषी ठरवत एक वर्षाच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. या निर्णयाविरोधात पतीने उच्च न्यायालयात अपील दाखल केले. तक्रार नोंदवण्यास उशीर झाला आणि साक्षीदारांच्या जबाबांत विसंगती असल्याचा युक्तिवाद त्याने मांडला होता.

या प्रकरणावर सुनावणी करताना न्यायमूर्ती एम. बी. स्नेहलता यांनी स्पष्ट केले की भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८-अ अंतर्गत होणारा छळ विशिष्ट काळापुरता मर्यादित नसतो. जोपर्यंत जाचाची वागणूक सुरू असते, तोपर्यंत तो गुन्हा सुरूच राहतो. त्यामुळे तक्रारीतील विलंब हा केवळ तांत्रिक मुद्दा ठरू शकत नाही.

न्यायालयाने नमूद केले की, फिर्यादीची बाजू विश्वासार्ह असल्यास उशिरा नोंदवलेली तक्रार प्रकरणाची विश्वासार्हता कमी करत नाही. वैवाहिक छळाच्या प्रकरणांमध्ये अति-तांत्रिक दृष्टिकोन स्वीकारल्यास कलम ४९८-अ चा मूळ उद्देशच धोक्यात येईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

## २४ परगण्यांत एसआयआरचा सर्वाधिक परिणाम

# मतदार यादीतील बदलांमुळे तृणमूलच्या गडाला धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) प्रक्रियेनंतर प्रसिद्ध झालेल्या सुधारित मतदार याद्यांमुळे सत्ताधारी तृणमूल काँग्रेसच्या पारंपरिक बालेकिल्ल्यांवर परिणाम झाल्याचे चित्र समोर आले आहे. विशेषतः मुस्लिमबहुल भाग आणि उत्तर व दक्षिण २४ परगणा या राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नावे वगळली गेल्याने विधानसभा निवडणुकीपूर्वी नवे समीकरण तयार होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

मतदार याद्यांतील



सुधारणांचा सर्वाधिक परिणाम उत्तर २४ परगणा, दक्षिण २४ परगणा, मुर्शिदाबाद, मालदा, उत्तर दिनाजपूर आणि दक्षिण दिनाजपूर या सहा जिल्ह्यांमध्ये झाला आहे. या सहा जिल्ह्यांमध्ये मिळून १०० हून अधिक विधानसभा जागा आहेत, त्यापैकी केवळ दोन २४ परगण्यांमध्येच ६४ जागा आहेत. २०११ पासून हे जिल्हे तृणमूल काँग्रेसच्या वर्चस्वाचे केंद्र मानले जातात. सुधारित यादीत सुमारे ६३.६६ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली असून ही संख्या एकूण मतदारांच्या सुमारे ८.३ टक्के आहे. यामुळे राज्यातील मतदारसंख्या ७.६६ कोटींवरून सुमारे ७.०४ कोटींवर आली आहे. याशिवाय ६०.०६ लाख मतदारांची कागदपत्रे अद्याप पडताळणीखाली आहेत. एकूण मिळून सुमारे १.२३ कोटी मतदार हे वगळले गेलेले किंवा निर्णयाधीन स्थितीत असल्याचे दिसून येते.

मुर्शिदाबादमध्ये सर्वाधिक, म्हणजे ११ लाखांहून अधिक मतदार प्रभावित झाले आहेत. मालदामध्ये सुमारे ८.३ लाख, तर उत्तर २४ परगण्यात सुमारे ५.९ लाख आणि दक्षिण २४ परगण्यात ५.२ लाख प्रकरणे तपासणीखाली असल्याची माहिती आहे. या जिल्ह्यांमध्ये मिळून सुमारे २३ लाख नावे वगळण्यात आल्याचे सांगितले जाते.

राज्याच्या २९४ विधानसभा मतदारसंघांपैकी २०० हून अधिक मतदारसंघांत वगळलेले व पडताळणीखाली असलेले मतदार यांची संख्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील विजयाच्या फरकापेक्षा जास्त आहे. किमान १२० मतदारसंघांत केवळ वगळलेल्या मतदारांची संख्या त्या मतदारसंघातील मागील विजयाच्या फरकापेक्षा अधिक आहे. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत १० हजारांपेक्षा कमी मतांनी निर्णीत झालेल्या ६० हून अधिक जागांवर या बदलांचा परिणाम होऊ शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

तृणमूल काँग्रेसच्या सूत्रांच्या मते, अल्पसंख्याक लोकसंख्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असलेल्या ४१ मतदारसंघांमध्ये वगळण्याचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी निर्णयाधीन मतदारांचा टक्का २१ टक्क्यांहून अधिक आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत या ४१ पैकी २९ जागांवर तृणमूल आघाडीवर होती.

दुसरीकडे, भारतीय जनता पक्षने ही प्रक्रिया मतदार याद्या शुद्ध करण्यासाठी आणि बेकायदेशीर स्थलांतरितांची नावे ओळखण्यासाठी आवश्यक असल्याचा दावा केला आहे. मात्र तृणमूल काँग्रेसने या प्रक्रियेवर आक्षेप घेत, ती राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप केला आहे. पक्षाचे नेते अभिषेक बॅनर्जी यांनी वगळण्याचे प्रमाण पूर्वनियोजित असल्याचे म्हटले आहे.